नि.दिवाणी दावा क्रं.५९/२००९
नि. क्रं.११८

**:: वादीचे अधिवक्ता श्री. व्ही.एन. संकाये यांनी ज्यादा सरतपास घ्यायचे नाही असे सांगितले. सबब त्याची नोंद घेतली.**

**:: प्रतिवादी क्र.१ ते ३ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. डी.टी. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरू. ::**

११. मला लिहिता व वाचता येत नाही. नागोराव हे आजोबा आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नागोराव यांना दोन मुले पांडुरंग व मलबा हे आहेत. नागोराव हे माझ्या जन्मानंतर वारले. त्यावेळी मी दोन ते तीन वर्षाची होती. नारायण हे मला एक लेकरू झाल्यानंतर वारले. मी अडीच वर्षाची होती त्यावेळी माझे वडील वारले. मी यापूर्वी पुराव्याचे शपथपत्र नि.१९ दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्ष शपथपत्र नि.११८ मध्ये चुकीचे वय लिहिले. माझ्या वडिलांच्या मृत्यूच्या नोंदीबाबत कागदपत्र दाखल करू शकते. माझ्या वडिलांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायतच्या अभिलेखामध्ये झालेली नाही. साक्षीदार स्वत:हून सांगते की, पूर्वी ग्रामपंचायतमध्ये नोंद होत नव्हती. मी फेरफार क्र.२४२ बघितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर फेरफार हा फक्त नारायणच्या वारसांच्या नावे होता. मी सदर फेरफाराविरुध्द न्यायालयामध्ये केस केलेली आहे. नारायणला दोन बायका होत्या. त्यांची नावे कोंडाबाई व पार्वती आहेत. काशिबाई ही पार्वतीची मुलगी होती. ती हयात नाही. काशीबाईला मुलं आहेत. परंतु किती मुलं आहेत व ते कुठे राहतात हे मला माहीत नाही.

१२. मी दावा दाखल करताना वाद मिळकतीचा ७/१२ बघितला होता. त्यावेळी व्यंकटच्या, अशोकच्या आणि अंकुशच्या नावे किती जमीन होती हे मला माहीत नाही. सदर ७/१२ उताऱ्यामध्ये उत्तम तुकाराम बिरादार, दिलीप व्यंकटराव बिरादार, अर्जुन तुळशीराम कावळे, रामचंद्र

किशनराव पेटे आणि हरिश्चंद्र पुंडलीक जठुरे यांची नावे होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर व्यक्तिंची नावे जमीन विक्री केल्याने आले होते.

१३. मी फेरफार क्र.४६७ बघितलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर फेरफार अंकुश आणि अशोक यांच्यामध्ये वाटणीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटण्या १९९४ मध्ये झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, मला वाटणीच्या दिवशीपासूनच त्याची माहिती होती. माझ्या वडिलांची मतदार यादीमध्ये नोंद नव्हती. घर क्रमांक २६ च्या खाल्लाकडून (पूर्वेकडून) मराठ्याची घरे आहेत, वरलाकडून (पश्चिमेकडून) मराठ्यांची घरे आहेत, राकसाकडून (दक्षिणेकडून) शेत आहे आणि गंगेकडून (उत्तरेकडून) गाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, नागोरावला पांडुरंग हा मुलगा होता हे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा मिळकतीमध्ये हिस्सा मागण्याचा अधिकार नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, बाबाराव गोपाळराव व्यंजने हे माझे वडील आहेत. मी अडीच वर्षाची असताना माझे वडील वारले. नारायण वलसेने मला ठेवून घेतले होते. माझ्या आईने बाबाराव व्यंजनेसोबत लग्न केले. हे म्हणणे खरे नाही की, मी बाबाराव व्यंजनेपासून जन्माला आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नागोरावच्या मुलाची मुलगी असल्याचे खोटे सांगितले. पुंडलिक सखाराम जठुरेच्या मुलाचे नाव मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुंडलिक सखाराम जठुरे आणि प्रतिवादी क्र.१ चे शेत गट क्र.२६ मध्ये आहे. प्रतिवादी क्र.१ ने पुंडलिकला शेत विकलेले आहे. दोघांचीही शेती एकमेकांलगत आहे. हे म्हणणे खरे आहे की,

त्यांच्यामध्ये धुऱ्याबाबत वाद झाला होता. परंतु तो वाद कधी झाला हे मला माहीत नाही. पुंडलिक आणि प्रतिवादी क्र.१ ने एकमेकांविरुध्द पोलीस कार्यवाही केली असेल. हे म्हणणे खरे नाही की, पुंडलिकने मला प्रस्तुत प्रकरण दाखल करण्यासाठी मदत केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पुंडलिकने मला नागोरावच्या मुलाची मुलगी भासवून खोटी केस करायला लावली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली. माझी प्रतिवादी क्र.१ सोबत भेट किंवा चर्चा झालेली नाही.

उलटतपास पूर्ण.

**:: प्रतिवादी क्र.४ ते १२ आणि त्यांचे अधिवक्ता गैरहजर आहेत. त्यांनी प्रकरण चालविण्यास आणि उलटतपास घेण्यास कसूर केला. सबब उलटतपास नाही. ::**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.
दि.२९/०१/२०२६.